# ।। सतगुरू पारख को अंग ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

## ।। अथ सतगुरू पारख को अंग लिखंते ।।

।। साखी ।।

सतगुरू सो सुखराम के ।। सांच झूठ दे छांट ।।
उलट होय गढ पर चढे ।। सास सुरत मन सांट ।।१।।

खरा सुखदेवाल परमात्मा कोण आहे,खोटे सुख सांगणारी व काळाच्या मुखात टाकणारी खोटी माया कोण आहे,हे जो निवडून निवडून वेगवेगळे करुन समजवतात ते सतगुरु आहेत जे संत बंकनाळच्या रस्त्याने उलटून दहाव्याद्वाराच्या गडावर चढून दहाव्येद्वाराच्या गडावर बसले आहे व ज्यांची सुरत,मन व श्वास एक जीव होऊन गेले आहे ते सतगुरु आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले जे बंकनाळेच्या रस्त्याने गडावर चढले नाही तसेच ज्यांची सुरत मन व श्वास एक जीव झाले नाही ते सतगुरु नाहीत ते जगातील मनुष्यांच्या बरोबरीच आहेत.।।१।।

साहेब बिन माने नही ।। ना काऊ सूं बेर ।।
सो सतगुरू सुखराम के ।। पुता त्रुगटी सेर ।।२।।

जे संत साहेबाशिवाय ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती,पारब्रम्हला मानत नाही तसेच त्यांच्याशी वैरही ठेवत नाही ते संत सतगुरु आहेत असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले जे संत त्रिगुटी शहरात पोहचले आहेत तेच सतगुरु आहे हे समजा. ।।२।।

त्रबेणी न्हावे सदा ।। आठ पोर रहे ध्यान ।।
सो सतगुरू सुखराम के ।। अणभे पूरण ग्यान ।।३।।

जे संत त्रिगुटीत गंगा,यमुना,सरस्वती मध्ये सदा स्नान करतात तसेच ज्यांचे आठोप्रहर त्रिगुटीमध्ये ध्यान राहते व जे बंकनाळच्या रस्त्याचा अनुभव घेऊन पूर्ण ज्ञान बोलतात तेच सतगुरु आहेत हे समजा असे आदि सतगुरु महाराज बोलले.।।३।।

आसा, त्रस्ना, कल्पना ।। कर करमा को नास ।।
सो सतगुरू सुखराम के ।। छाड्यो पूरब बास ।।४।।

ज्या संताची मायेच्या सुखांची आशा व तृष्णा मिटून गेली आहे व सोबत मायेच्या सुखांची मनात कल्पना ही उठत नाही व मायेच्या सुखांच्या आशा,तृष्णा व कल्पनेच्या कर्मांचा नाश केला आहे तेच सतगुरु आहे असे समजा.ज्या संताने पूर्व म्हणजे भृगुटीचा निवास म्हणजे जन्म मरणाच्या गतीत येण्याचा निवास सदाकरीता त्यागला आहे तेच संत सतगुरु आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।४।।

प्रमेसर सु रत सदा ।। भूला सबे विकार ।।
सो सतगुरू सुखराम के ।। पूंथा दसवें द्वार ।।५।।

जे संत परमेश्वरावर सदा अवलंबून राहतात व दुसरे सर्व विकार म्हणजे ब्रम्हा, विष्णु,

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

महादेव,शक्ती,अवतारदिकाची सेवा,पूजा,तीर्थ,व्रत,योग,यज्ञ इत्यादी विसरुन गेले आहे व दहाव्याद्वारात पोहचून गेले आहे तेच सतगुरु आहे असे सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।५।।

**दरसण करे हे दीन का ।। ईण काया के माय ।।**
**सो सतगुरू सुखराम के ।। दूजा कहिये नाय ।।६।।**

जे संत सतस्वरुप परमात्म्याला आपल्या कायेत सदा पाहतात तेच सतगुरु आहेत असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले जे संत सतस्वरुप परमात्म्याला आपल्या कायेत जराही कधी पाहत नाही ते सतगुरु नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।६।।

**वे जन जुग कूं तारसी ।। ज्यारे अणभे प्रवाना हात ।।**
**वे सतगुरू सुखराम के ।। सब बातन की बात ।।७।।**

ज्या संताने अणभय देशातून जीव तारण्याचा परवाना आणला आहे तेच जीवाला तारतील दुसरे कोणीही संत जीवाला तारु शकणार नाही म्हणून अणभय देशातून जीव तारण्याचा ओहदा आणला आहे तेच सतगुरु आहेत दुसरे गुरु एक ही सतगुरु नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।७।।

**जांकू हरि दूवो दियो ।। से जन त्यारे जीव ।।**
**वां बिन हर सिंवरण करो ।। प्रथ न मिलसी पीव ।।८।।**

ज्या संतांना हरी कडून जीव तारण्याची आज्ञा मिळाली आहे तेच संत जीवाला तारतील त्या संताचा शरणा सोडून अन्य कोण्या संताचा शरणा घेऊन रात्रं-दिवस रामजीच्या नामाचे स्मरण केले तरी ही मालक मिळणार नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी जतविले.।।८।।

**फळ पावे पदवी मिले ।। गरभ न छुटे कोय ।।**
**दुवा बिना बोहो साधरे ।। ज्या संग मोख न होय ।।९।।**

दुसऱ्या संतांच्या सोबत वैकुंठापर्यंत पदवी मिळेल परंतु संतांच्या शरणात गेलेल्या त्या जीवाचा गर्भ कधी सुटणार नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले अशा प्रकारे वैकुंठापर्यंत पदवी देणारे जगात अनेक संत आहेत परंतु त्यांच्या सोबत काळा-पासून मोक्ष मिळत नाही त्यांच्या जवळ जीव तारण्याचा ओहदा नाही. ।।९।।

**सुणज्यो सब साची कंहु ।। इणमे फेर न सार ।।**
**भजन किया ही तारसी ।। साचा जन की लार ।।१०।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,मी सत्य सांगतो त्याच्यात उलट सुलट जराही अंतर पकडू नका जीव भजन केल्यावर खऱ्या संताच्या शरणाने तिरेल भजन

केल्यावरही नकली म्हणजे काळाच्या मुखात बसलेल्या संतांच्या मागे एक ही जीव तिरणार नाही. ।।१०।।

साचा सतगुरू संतवे ।। उलट चडे आकास ।।
जन सुखिया अणभे घणी ।। ध्यान त्रगुटी बास ।।११।।

खरे सतगुरु खरे संत ते आहेत जे बंकनाळच्या रस्त्याने उलटून आकाश म्हणजे त्रिगुटी पोहचले आहेत.ज्यांना उलटून आकाश चढण्याचा पूर्ण अनुभव आहे व ज्यांचे ध्यान त्रिगुटीत लागले आहे तसेच जे त्रिगुटीत निवास करुन राहिले आहे तेच खरे सतगुरु, खरे संत आहेत अन्य सर्व खोटे सतगुरु,खोटे संत आहेत. ।।११।।

दरगा सूं ले आविया ।। सतगुरू पदवी संत ।।
वे तारे सुखराम के ।। जुग मे जीव अनंत ।।१२।।

जे संत,जे सतगुरु परमात्म्याच्या दर्ग्यातून जीव काळापासून मुक्त करण्याची पदवी आणतात तेच सतगुरु जगात अनंत जीव काळापासून मुक्त करतात असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।१२।।

अणभे की परवानगी ।। दीनी सिरजन हार ।।
वे सतगुरू सुखराम के ।। तिरबो वां की लार ।।१३।।

अणभय देशात जीवांना पोहचविण्याची परवानगी ज्या सतगुरुला सिरजनहार परमात्म्याने म्हणजे जीवांना सृष्टीमध्ये जन्म दिला आहे त्या सिरजनहार परमात्म्याने दिली आहे त्या सतगुरु सोबतच जीवांचे तिरणे होते असे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी सांगितले. ।।१३।।

अमराव वकिल रे ।। हाकम बगसी दिवाण ।।
सब ओहदा सुखराम के ।। नरपत की फुरमाण ।।१४।।

राजा प्रजेमधून कोणाला उमरावची पदवी देतो,कोणाला वकील बनवितो,कोणाला दिवाण बनवितो अशाप्रकारचे ओहदे वेगवेगळ्या मनुष्यांला राजा देतो असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।१४।।

ब्रम्हा सिरज्यो रचन कूं ।। बिस्न करण प्रतपाळ ।।
सिव कूं रच्यो संघार कूं ।। इंद्र बरसण मेघ माळ ।।१५।।

अशाचप्रकारे सिरजनहार परमात्म्याने ब्रम्हाला सृष्टी रचनेचा ओहदा दिला,विष्णुला सृष्टीत जन्मलेल्या जीवांचा प्रतिपाल करण्याचा ओहदा दिला तर शिवाला जीवांचा संहार करण्याचा ओहदा दिला व इंद्राला जलवर्षा करण्याचा ओहदा दिला.या कोणालाही जीव काळापासून मुक्त करण्याचा ओहदा दिला नाही. ।।१५।।

पाप पुन्न का न्याव कूं ।। सिरज्यो हे जमराज ।।

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

संत सिरज्या सुखराम के ।। जीव उधारण काज ।।१६।।

असेच पाप व पुण्यांचा न्याय करण्याचा यमराजला ओहदा दिला म्हणजे ब्रम्हा,विष्णु, महादेव,इंद्र,यमराज जे जीव परमात्म्याने पैदा केले त्यांना परमात्म्याच्या पदास पोहचविण्याचा ओहदा फक्त बंकनाळेने त्रिगुटी चढलेल्या संताला दिला म्हणून ब्रम्हा, विष्णु,महादेव इत्यादी सतगुरु नाहीत.सतगुरु फक्त बंकनाळेने त्रिगुटीत पोहचले ते संत आहेत. ।।१६।।

कोई नाव कोई डूंडका ।। कोई सतगुरू ज्यूं जहाज ।।
सब तारे सुखराम के ।। भवसागर महाराज ।।१७।।

सागरातून तिरण्याकरीता डुंड्का म्हणजे एकदम छोटी नाव,थोडी मोठी नाव व जहाज (एकदम मोठी नाव)असे वेगवेगळ्या प्रकारच्या नाव असतात असेच भवसागरातून तारण्याकरीता तीन प्रकारचे संत असतात.कोणी डुंड्कासारखे असतात.कोणी त्याच्याहून मोठ्या नावेसारखे असतात तर कोणी त्यापेक्षा एकदम मोठी नावे म्हणजे जहाजा सारखे असतात.या तिन्ही नाव जसे सागरातून जीव तारतात तसेच डुंड्क्यासारखे सतगुरु,मध्य नावेसारखे सतगुरु व जहाजासारखे सतगुरु हे तिन्ही भवसागरातून जीव तारतात. ।।१७।।

नौका संग सो दोय सो ।। लाखाँ तारे जाझ ।।
जन सुखिया गुरू डूंडका ।। करो अपणो काज ।।१८।।

नौके सारखे सतगुरु असतात ते शंभर,दोनशेंना तारतात जहाजा सारखे सतगुरु असतात ते लाखो तारतात,तर डुंड्क्या सारखे सतगुरु असतात.ते फक्त आपले कार्य करतात असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।१८।।

अे दोऊं भव तारसी ।। एक सतगुरू अेक ज्हाज ।।
गुण ओगण देखे नही ।। बहे बिड़द की लाज ।।१९।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले जहाज व जहाजा सारखे सतगुरु हे दोन्ही तारतात म्हणजे जहाज सागरातून व सतगुरु भवसागरातून जीवांना तारतात हे दोघे ही तारते वेळी जीवांचे गुण व अवगुण पाहत नाही.हे जहाज व जहाजरुपी सतगुरु आपले तारण्याचे ब्रीद म्हणजे धर्माच्या लाजेने चालतात. ।।१९।।

क्या सुखरत मुर्दे किया ।। मिली संजीवन आय ।।
सुखिया जे जीवे नही ।। तो बिड़द जड़ी को जाय ।।२०।।

सतगुरुंचे ब्रीद कसे असते याचा एक सामान्य दाखला दिला–जसे एक मुर्दा नदीत वाहत जात होता त्याने आधीचे कोणते ही सुकृत असे केले नव्हते की त्याला मृत्युनंतर संजीवनी बुटी मिळेल व तो मुर्दा जिवंत होऊन जाईल तो मुर्दा संजीवनी बुटीला

जाणतही नव्हता.परंतु पाण्यात एका बाजुने संजीवनी बुटी वाहत आली आणि मुर्दाच्या तोंडात पड्ली व तो मुर्दा जिवंत होऊन गेला.आता जडी मुर्द्याच्या मुखात पड्ल्यावर नंतर ही मुर्दा जिवंत होत नाही तर त्या संजीवनी बुटीला संजीवनी बुटी कोणी म्हणणार नाही तिला जंगलातील साधारण बुटी म्हणतील अशाचप्रकारे संत सतगुरु स्त्री पुरुषांला भेटले व त्या स्त्री–पुरुषांचे तिरणे झाले नाही तर त्या संताला सिरजनहार परमात्मापासून मिळालेला ओहदावाला कोणी म्हणणार नाही म्हणून हे संत आपल्या ब्रीदचा विचार करुन भेटलेल्या स्त्री–पुरुषांला भवसागरातून तारतात. ।।२०।।

पारस परस्यां गुण काहा ।। लोहा कंचन न होय ।।
पाहण सम सुखराम क्हे ।। पारस कहे न कोय ।।२१।।

जसे लोखंडाला जर पारस लागून गेला आणि त्या लोखंडाचे जर सोने नाही बनले तर त्याला पारस कोण म्हणेल.त्याला दुसऱ्या दगडासारखे समजून,कोणी त्याला पारस नाही म्हणणार तसेच कोणी जीव,संताला भेटला आणि त्याचा उध्दार नाही झाला तर त्या संताला संत कोण म्हणेल.दुसरे अन्य संसाराच्या मनुष्यासारखा मनुष्यच म्हणतील. पारस दगड हा जड आहे आणि लोखंड ही जड आहे.जडाने जडाचे रुपांतर होते तर चैतन्य संताशी,चैतन्य जीवाचा का उध्दार होणार नाही? ।।२१।।

निजनाव सिष मे जगे ।। काग पलट हुवे हंस ।।
वे सतगुरू सुखराम केहे ।। पारब्रम्ह को अंस ।।२२।।

त्या संताशी शिष्य भेटताच त्या शिष्यमध्ये जे संतामध्ये नाम आहे तेच नाम शिष्यात जागृत होऊन जाईल आणि शिष्याची कावळ्याची बुध्दी पलटून हंसाची होऊन जाईल तसेच कावळ्यापासून हंस करणारे जे सतगुरु आहेत ते सतस्वरुप पारब्रम्हचे अंश आहे. ।।२२।।

नीर क्षिर निर्णा करे ।। वे साचा गुरू पीर ।।
हंसा कूँ सुखराम क्हे ।। नाव चुगावे हीर ।।२३।।

जसे हंस पक्षी पाणी व दूध याचा निर्णय करणे समजतो तसेच खरे गुरु माया व सतस्वरुप परमात्म्याचा निर्णय समजतात व त्या निर्णयाला वेगवेगळ्या प्रकारे हंसांना समजावतात व त्या हंसांना रामनामाचे हीरे चुगवितात असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।२३।।

सुखिया संत छाया पडे ।। जम पुरी मे आय ।।
जीवां की ज्वाला बुझे ।। क्रोध जमाका जाय ।।२४।।

अशा संताची यमपुरीत छाया ही पडून गेली तर त्या छायेच्या योगाने तेथे नरकवास भोगत असलेले जीवांची तपन शांत होते आणि यमदुताचा क्रोध नाही सारखा होऊन

जातो.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।२४।।

जम जालम की त्रास सूं ।। हंसा करे पुकार ।।
सुखिया साहेब आविया ।। ले जन को अवतार ।।२५।।

हा यम खुप जालीम आहे त्या यमाच्या त्रासाने जीव साहेबाला पुकार करतात तेव्हा साहेब संताचा अवतार घेवून जीवाचा उध्दार करण्याकरीता संसारात येतात. ।।२५।।

।। इति सतगुरू पारख को अंग संपूरण ।।